# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ२०१७/मॉपो/प्र.क्र.११/संगणीकरण कक्ष,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०००३२
दिनांक:-२२/०५/२०१७

प्रति,

१.विभागीय आयुक्त, (सर्व)
२.आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३.जिल्हाधिकारी, (सर्व)
४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद(सर्व)
५.तहसिलदार तथा प्रशासक/ मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपंचायती(सर्व)

विषय:- निवडणुकीपुर्वी मतदान यंत्र तयार करणे व मॉक पोल बाबत..

महोदय/ महोदया,

मागील काही निवडणुकांमध्ये मतदान यंत्राबाबत अनेक राजकीय पक्षांनी व उमेदवारांनी संशय व्यक्त केलेला आहे. या पार्श्वभुमीवर मतदान यंत्र संबंधात आयोगाने वेळोवेळी पारित केलेले आदेशाचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे. सदर आदेशांमधील विनिर्दीष्ट केलेल्या प्रक्रियेची व टप्प्यांची पुर्णपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. विशेषत: ज्या प्रक्रियेमध्ये राजकीय पक्ष/ उमेदवार/ प्रतिनिधी यांचा सहभाग असतो, त्या प्रक्रियेची आदेशानुसार तातोतंत अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ज्या प्रक्रियेबाबत राज्य निवडणूक आयोगाने वेगळे आदेश पारीत केले नसतील त्या प्रक्रियेकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदान यंत्राबाबत वेळोवेळी पारीत केलेले आदेश लागू रहातील.

२. भारत निवडणूक आयोगाच्या दि.२३ सप्टेंबर, २०१० रोजीच्या सूचना क्र.८ मधील परिच्छेद ३ नुसार मतदान यंत्रे तयार करण्यापुर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या एकूण मतदान यंत्राच्या १०% मतदान यंत्रात किमान १००० मते नोंदवून मॉक पोल (प्रतिरूप मतदान) करण्याचे आदेश आहेत. भारत निवडणूक आयोगांच्या निवडणुका एक सदस्यीय आहेत, परंतु राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणुका बहुसदस्यीय आहेत; त्यामुळे १०% मतदान यंत्रांमध्ये अशी मते नोंदविताना प्रत्येक मतदान यंत्रावरील एकूण जागा व त्यावरील उमेदवार यांची संख्या विचारात घेऊन

एकूण १००० मतांची नोंदणी करण्यात यावी. अशा प्रकारे १०% मतदान यंत्रांची निवड करताना प्रत्येक प्रभागामधील काही यंत्रे निवडण्यात येतील याची दक्षता घ्यावी. उर्वरित मतदान यंत्राची सर्व उमेदवारांची बटणे योग्य प्रकारे काम करीत आहेत याची खात्री होईल इतकी मते नोंदवावीत. उमेदवार/ त्यांचे प्रतिनिधी यांनाही मते नोंदविण्याची संधी देण्यात यावी.

३. भारत निवडणूक आयोगाच्या दि.३०/१०/२००९ रोजीच्या सूचना क्र.१० नुसार मतदानाच्या दिवशी मॉकपोल करणे अनिवार्य आहे. याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मतदानाच्या दिवशी सकाळी ठिक ६.३० वा. मॉक पोल घेण्यात यावे. याकरिता राजकीय पक्ष/ उमेदवार यांच्या बैठकीमध्ये मॉकपोलकरिता उपस्थित राहाण्याबाबत सूचना देण्यात यावी. तसेच मतदानाच्या दिवशी उमेदवार/ मतदान प्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे याबाबत योग्य वेळी सूचना द्यावी. मॉक पोलकरिता विहित वेळेमध्ये उपस्थित असलेल्या उमेदवार/ त्यांचे मतदान प्रतिनिधींना मतदान नोंदवून खात्री करण्याची संधी देण्यात यावी. उमेदवार/ प्रतिनिधी उपस्थित असले तरीही मॉक पोलची प्रक्रिया राबवून मतदान यंत्र सुस्थितीत असल्याची खात्री करावी. या मॉक पोलमध्ये प्रत्येक उमेदवारनिहाय किमान एक मत आणि सर्व उमेदवारांची मिळून किमान ५० मते नोंदविली जातील याची दक्षता घ्यावी.

४. तसेच सध्या मतदान यंत्राबासबत उपस्थित केला जाणारा संशय विचारात घेता, कँडीडेट सेटींग करण्यापुर्वी घ्यावयाच्या मॉक पोल व मतदान केंद्रावर करावयाचे मॉक पोल या दोन्ही मॉक पोलच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात व उपस्थित उमेदवार/ प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरीसुध्दा नोंदवाव्यात. तसेच कँडीडेट सेटींग करण्यापुर्वी घ्यावयाच्या मॉक पोलचे संपूर्ण व्हीडियओशूटींग करून ते जतन करावे. तसेच मतदान केंद्रावर करण्यात येणाऱ्या मॉक पोलचे देखील शक्यतो संबंधित मतदान केंद्राध्यक्ष यांनी त्यांच्या मोबाईलद्वारे फोटो/व्हीडीओ शूटिंग घ्यावे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

आपला

(अविनाश सणस)
उप आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र